# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (ज़िल्हा):** ठाणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** शहापूर **Year (वर्ष):** 2021

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0314 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/07/2021 01:13 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरम्यानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 22/06/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 26/07/2021
**Time From (वेळेपासून):** 10:20 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:23 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/07/2021 **Time (वेळ):** 00:48 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/07/2021 00:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालि,समोर चहाचे टपरीजवळ शहापुर येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सदु उर्फ सदाशीव तुकाराम पांढरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1961 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | तुते, पो आवरे ,ता शहापुर, ,शहापूर ,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | तुते, पो आवरे ,ता शहापुर, ,शहापूर ,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9769264731**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पंडीत श्रीपत गोखणे लोकसेवक | | | 1. 304 b,भानुदास अपार्टमेंट , दत्त मंदि, जवळ ऐरवली गाव, नवी मुंबई,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक. 21/05/2021 मी सदु उर्फ सदाशीव तुकाराम पांढरे वय-60 वर्षे, धंदा-शेती,रा.मु. तुते, पो.आवरे ,ता.शहापुर, जि.ठाणे, मो.क्रं-9769264731.मी वर पत्यावर माझे कुटुंबासह राहण्यास असुन मी सदर तुतेगावचा स्थानिक रहिवाशी आहे..मी, शेतीचा व्यवसाय करून त्यावर माझा व माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.दिनांक-21/06/2021 रोजी मी, पोनि श्री.सुरेश चोपडे यांना मोबाईल फोनद्वारे कळविले की, मला एका लोकसेवकाविरूद्ध लाचेच्या मागणी संदर्भात तक्रार द्यायची आहे. पण मी कामात व्यस्त असल्याणे ठाण्याला येवु शकत नाही. त्यावेळी पोनि/श्री.सुरेश चोपडे यांनी मला आम्ही पडताळणी पथकासह दिनांक-22/06/2021 रोजी सकाळी 10.30 वा. पावेतो परिवार हटेल आसनगाव, शहापुर येथे येतो तुम्ही तेथे येवुन आम्हाला भेटा असे सांगितले.त्याप्रमाणे मी दिनांक 22/06/2021 रोजी सकाळी10.30 वा.चे अगोदरच सदर परिवार हटेल आसनगाव, शहापुर येथे येवुन थांबलो असताना थोड्याच वेळात पोनि सुरेश चोपडे, यांनी त्यांची व्हॅगनर गाडी परिवार हटेलचे आवारात पार्क केली. त्यावेळी सपोउपनि/विचारे यांनी वाहनातुन खाली उतरून आवाज देवुन मला गाडीत बसण्यास सांगितले व सपोउपनि/विचारे हे गाडी बाहेरच दरवाजाजवळ थांबुन राहीले. मी गाडीत बसल्यानंतर पोनि श्री सुरेश चोपडे यांनी मला, त्यांची स्वत:ची ओळख करून देवुन, गाडीत हजर असलेले सपोउपनि/सोडकर, दोन्ही पंचाची व गाडीजवळ उभे असलेले सपोउपनि/प्रकाश विचारे यांची ओळख करून दिली.त्यानंतर पोनि/सुरेश चोपडे यांनी माझेकडे तक्रारीबाबत विचारना केली असता मी लाचेच्या मागणीबाबत लोकसेवक गोखणे यांचे विरूद्धचा लिहुन आणलेला लेखी तक्रारी अर्ज पोनि/सुरेश चोपडे यांचेकडे दिला. पोनि/सुरेश चोपडे यांनी सदरची तक्रार वाचल्यानंतर मला तक्रारीची हकीगत दोन्ही पंचाना सांगण्यास सांगितली. मी सांगितलेली हकिकत अशी की, माझी कवडास ता.शहापुर जि.ठाणे येथे सर्व्हे नं 15/2/ब ही 24 गुंठे जागा आहे. सदरची जागा माझे नावे असुन ती जागा मी मयुर भुपतराव यांना विकनार आहे. सदर जागा मोजनी करून हद्द निश्चीत केली आहे. सदरची मोजनी दि.11/6/2021 रोजी केली त्यावेळी सदर जागा टेपने मोजनी केली असल्याने सुमारे तिन गुंठे अंदाजे जागा जास्त निघत आहे. मशीन ने मोजनी मान्य नसल्याने टेपने केलेल्या जागेची मोजनी पंचनामा पाहिजे असल्यास मोजनी करनारे लोकसेवक गोखणे साहेब यांनी माझेकडे 8000/- रूपये ची मागणी केली. त्यावेळी मला मोजणी पंचनामा पाहिजे असल्याने मी त्यांना नाईलाजास्तव 4000/- रूपये ऑफिसचे बाहेरिल चहा टपरीसमोर दिले. त्यानंतर मी 2-3वेळा मोजनी पंचनामा घेण्यासाठी गोखणे भाऊसाहेब यांना भेटलो असता त्यांनी माझेकडे वेळोवेळी पैशाची मागणी केली. मी दिनांक 21/6/2021 रोजी पुन्हा मोजनी पंचनामा घेण्याकरिता भुमी अभिलेख ऑफिसला गेलो असता लोकसेवक गोखणे यांनी माझेकडे पाच हजार रूपयाची मागणी केली. मला लोकसेवक गोखणे यांना पैशे देण्याची इच्छा नसल्याने त्यांचे विरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यासाठी मी आज दि.22/6/2021 रोजी सकाळी 10.20 वा. पोनि श्री सुरेश चोपडे अ‍ॅन्टिकरप्शन ब्युरो ठाणे यांचेकडे लेखी तक्रारी अर्ज दिला असल्याचे सांगीतले. दोन्ही पंचानी मला काही प्रश्न विचारून तक्रारीतिल मजकुर समजावुन घेऊन दोन्ही पंचानी व समक्ष म्हणुन पोनि सुरेश चोपडे यांनी मी दिलेल्या तक्रारी अर्जावर



Scanned with CamScanner

करत असताना मी त्यांना कार्यालयाचे बाहेर चहा पिण्यासाठी घेऊन आलो. टपरीवर आम्ही दोघांनी चहा पिल्यानंतर मी लोकसेवक गोखणे यांना त्यांनी मागणी केलेली 0 रूपये लाचेची रक्कम त्यांचे उजवे हातात दिले. ती त्यांनी त्यांचे पँन्टचे उजव्या खिशात ठेवले असता मी डोक्यावर हात फिरवुन सापळा पथकास पुर्व नियोजीत इशारा ा असता सापळा पथकाने त्यांना घेराव घालुन रंगे हाथ पकडले. ती वेळ 13.23 वा. ची होती. सदर वेळी पोनि/ सुरेश चोपडे यांचे सुचनेवरून पंच नं 2 श्री विवेक सावंत नी सदर लोकसेवक गोखणे यांचे पँन्टचे खिशाची तपासनी केली असता त्यांचे पँन्टचे उजव्या खिशात लाचेची रक्कम मिळुन आली सदरची लाचेची रक्कम पोनि सुरेश चोपडे यांचे सुचनेवरून पंच नं 2 यांनी त्याचे स्वताचे ताब्यात ठेवले त्या दरम्यान सपोउपनि/सोंडकर यांनी माझे कडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यावेळी पोनि/सुरेश चोपडे यांनी ताब्यात घेतलेले लोकसेवक यांना त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव लोकसेवक पंडीत श्रीपत गोखणे वय-52 वर्षे,लिपीक,नगरभुमापन उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, शहापुर जि.ठाणे रा. बी.304, भानुदास अपार्टमेंट , दत्त मंदिराजवळ . ऐरवली गाव, नवी मुंबई , मुळ गाव मु-शेंद दक्षिण,पो.शिरूर,आनंतपाळ,जि.लातुर असे सांगितले.

सदरवेळी भुमी अभिलेख कार्यालयात कार्यलियीन कामकाज चालु असल्याने कार्यालयात व कार्यालया बाहेर नागरीकांची गर्दी होती. त्यामुळे पुढील कार्यवाही शासकीय विश्रामगृह शहापुर येथे जाऊन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर ताब्यात घेण्यात आलेले लोकसेवक,दोन्ही पंच, सापळा पथक अशी शासकीय वाहनाने व पोनि/सुरेश चोपडे यांचे व्हॅगनर कारने शासकीय विश्रामगृह शहापुर येथे येऊन सदर ठिकाणी उपलब्ध करून दिलेल्या रूममध्ये पुढील कार्यवाही सुरु करण्यात आली. पोनि सुरेश चोपडे यांचे सुचनेनुसार सदर रूम मध्ये अंधार करून अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात लोकसेवक पंडित गोखणे यांचे दोन्ही हात व कपडयांची पाहणी केली असता त्यांचे उजव्या हाताचे बोटावर व तळहातास, अँथ्रासीन पावडर लागले असल्याचे हिरवट झाकेत चकाकताना दिसुन आले.

पोनि/सुरेश चोपडे यांचे सुचनेवरूंन लोकसेवक पंडित गोखणे यांनी स्विकारलेल्या 2000 रूपये लाचेच्या रकमेतील नोटांचे क्रमांक पंच क्र 2 श्री विवेक सावंत यांनी पडताळुन पाहिले असता ते सापळा पुर्व कारवाई दरम्यान नोंदविलेल्या नोटांचे क्रमांकाशी जुळुन आले. सदर कक्षामध्ये अंधार करून अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात सदरच्या लाचेच्या रकमेतील नोटांची तपासनी केली असता सदर नोटांना दोन्ही बाजुस बरपुर प्रमानात अँथ्रासिन पावडर लागल्याची हिरवट झाकेत चकाकताना दिसुन आले.

अशा प्रकारे मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने पोनि सुरेश चोपडे अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे व त्यांचे पथकाने दि.22/6/2021 रोजी केले पडताळनी कारवाई मध्ये लोकसेवक पंडित श्रीपत गोखणे वय-52 वर्षे,लिपीक,नगरभुमापन, उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, शहापुर जि.ठाणे यांनी लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरूपयोग करून स्वता:चे आर्थीक फायद्यासाठी माझे मौजे कवडास येथील जमिनीचे टेपने केलेल्या मोजनीमध्ये मशिनने केलेल्या मोजनीपेक्षा तिन गुंठे जमिन अधिक वाढल्याने तसा पंचनामा करून देण्यासाठी माझेकडे 5000 रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी करून तडजोडी अंती 2000 रूपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. तसेच दि.26/7/2021 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई मध्ये लोकसेवक पंडित गोखणे यांनी मागणी केलेली 2000 रूपये लाचेची रक्कम माझे कडुन स्विकारली असताना त्यांना सापळा पथकाने उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयाचे समोर चहाचे टपरीजवळ शहापुर येथे 13.23 वाजता रंगेहाथ पकडल्याने म्हणुन माझी त्यांचे विरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम सन 1988 (सुधारना सन 2018) चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष

हे लिहुन दिले सही ता.

( सुरेश चोपडे)
पोलिस निरीक्षक ,
अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे

Scanned with CamScanner

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** RAJKUMAR MARUTI UPASE(I (Inspector)) / PCMH85787 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station(प्रभारी अधिका-याची**
**Name (नाव):** RAJKUMAR MARUTI UPASE
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PCMH85787

Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**

Scanned with CamScanner